# जनसंपर्क अधिकारी

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट २५३-२२ दिनांक १७/०८/२०२२

## विविध दाखल गुन्हयातील एकुण ५,४१,२५०/- रु. किंमतीचा जप्त मुददेमाल स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पीडीतांना परत करण्यात आला - तुळींज पोलीस ठाण्याचा उपक्रम

तुळींज पोलीस ठाणे येथे दाखल असलेले विविध गुन्हे व त्यातील उघड करण्यात आलेल्या गुन्हयामधील जप्त मुद्देमाल स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी दिनाचे औचित्य साधून तुळींज पोलीस ठाणे मार्फतीने फिर्यादी यांना परत करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. त्यावेळी तुळींज पोलीस ठाणेस दाखल असलेल्या १) गु.र.क्र. ४५७/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि.सं. या गुन्हयातील चोरीस गेलेली ॲटोरिक्षा, २) गु.र.क्र. ३२५/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि.सं.मध्ये चोरीस गेलेले सोन्याचे ब्रेसलेट व ३) गु.र.क्र. ४७१/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि.सं. मध्ये चोरीस गेलेला मोबाईल असा एकुण २,६१,२५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल तसेच नागरिकांचे हरविलेले सॅमसंग, ओप्पो, विवो, रियल मी अश्या वेगवेगळया कंपन्यांचे मोबाईल फोन यांचा तांत्रिक कौशल्यपुर्ण तपास करुन एकुण २,८०,०००/- रु. किंमतीचे ३० मोबाईल फोन असा एकुण ५,४१,२५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन दिनांक १५/०८/२०२२ रोजी देशाच्या ७५ व्या स्वातंत्र्य अमृत महोत्सवी वर्षाचे औचीत्य साधुन नागरिकांना परत करण्यात आला आहे.

सदर कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, वसई, श्री. पंकज शिरसाट, सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र कांबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. मिथुन म्हात्रे, पो.उप.निरी. बी.एस.बांदल, स.फौ.एस.पी.सुतनासे, पो.हवा. ए.आर.शिंदे, ए.एस.मोरे, पो.ना. यु.जे.वरठा, पो.अं. ए.एम.जमादार, व्ही.के.राऊत, आय.जी.छपरीबन, पांडुरंग केंद्रे यांनी केली आहे.

----oooo----